मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ १६०९४ (मुंबई)

# राज्य मराठी विकास संस्था

(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई - ४००००१
दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ www.rmvs.in इ-टपाल : project4.rmvs@gmail.com

## आवाहन

## महाराष्ट्रातील मराठी भाषा व मराठी साहित्य या संदर्भात संशोधन करणाऱ्या मान्यताप्राप्त मंडळ / संस्थांसाठी अर्थसाहाय्य योजना

**महाराष्ट्र शासन पुरस्कृत राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेतील उद्दिष्ट क्रमांक** १. महाराष्ट्राची व्यवहारभाषा, प्रशासनिक भाषा आणि ज्ञानभाषा या तिनही स्तरांवर मराठी भाषेचा सर्वांगीण वापर वाढविणे, उद्दिष्ट क्र. ४ - शासनव्यवहाराच्या प्रशासन, कायदा, न्याय, जनसंपर्क अशा विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये मराठी भाषेचा लोकाभिमुख आणि सुलभ वापर वाढविण्यासाठी भाषिक उपक्रम हाती घेणे व उपकरणे निर्माण करणे. या उद्दिष्टांना अनुसरून **राज्य मराठी विकास संस्थेमार्फत महाराष्ट्रातील मराठी भाषेसंदर्भात संशोधन करणारे मंडळ / संस्था यांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी पुढील योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.**

**मराठी भाषा विभागाचे, मराठी संशोधन मंडळ/संस्थांना अर्थसाहाय्य करण्याबाबत. संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/ भाषा-३, दि. ३ जानेवारी, २०१७ चे पत्र.**

**``या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळांना / संस्थांना प्रत्येकी रु. ५ लक्षच्या मर्यादेत अर्थसाहाय्य करणे. त्यानुसार सदर योजनेची अंमबजावणी करण्यासाठी कार्यपद्धती, निकष, नियम व अटी पुढीलप्रमाणे ठरविण्यात येत आहेत.''**

महाराष्ट्र राज्यात मराठी भाषा व मराठी साहित्य या संदर्भात दर्जेदार कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त मंडळांना / संस्थांना अर्थसाहाय्य देण्याच्या अनुषंगाने राज्य मराठी विकास संस्थेने, २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मंडळांना / संस्थांना अर्थसाहाय्य देण्यासाठी पात्र मंडळे / संस्था यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०१९ या योजनेसंदर्भासाठीचा विहित माहितीचा ऑनलाईन भरावयाचा अर्ज तसेच इतर तपशील संस्थेच्या www.rmvs.in या संकेतस्थळावर **`महाराष्ट्र राज्यात मराठी भाषा व मराठी साहित्य या संदर्भात दर्जेदार कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त मंडळांना / संस्थांना अर्थसाहाय्य' या नावाने खाली दर्शविलेल्या** शिर्षकावर टीक करून ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे व इतर माहिती पीडीएफ स्वरूपात किंवा स्कॅन करून जोडण्यासाठी संस्थेचा इ-टपाल पत्ता project4.rmvs@gmail.com यावर पाठवावी. सदर अर्थसाहाय्याचा अर्ज विहित नमुन्यात विहित कालावधीत (दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत ) राज्य मराठी विकास संस्थेकडे ऑनलाईन स्वरूपात सादर करणे बंधनकारक राहील. विहित कालावधीनंतर येणाऱ्या अर्जांचा अर्थसाहाय्यासाठी विचार केला जाणार नाही.

महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळांना / संस्थांना सदर योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

१. अर्जदार संस्था /मंडळ मराठी भाषा आणि साहित्य यांचा अभ्यास व संशोधन करणारी असावी. बहुउद्देशीय संस्था नसावी.

२. सदर जाहिरातीस अनुसरून महाराष्ट्रातील मंडळे / संस्था यांनी त्यांचा प्रकल्प / उपक्रम / योजना यांबाबतचा प्रस्ताव (अंदाजित आर्थिक तपशिलासह) सोबत जोडलेल्या विहित ऑनलाईन अर्जासह व इ-टपालद्वारे राज्य मराठी विकास संस्थेकडे विहित कालमर्यादेत पाठविणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र शासन पुरस्कृत राज्य मराठी विकास संस्थेकडून अर्थसाहाय्य मिळण्याच्या अनुषंगाने, अर्जदार साहित्य मंडळ व संस्थांनी अर्ज परस्पर शासनास सादर न करता, विहित नमुन्यात व विहित कालावधीत महाराष्ट्र शासन पुरस्कृत राज्य मराठी विकास संस्थेकडे अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

४. अर्जदार मराठी भाषा मंडळ / संस्थांनी अर्जासोबत अर्जाच्या दिनांकापूर्वीच्या पाच वर्षांच्या कामाचा अहवाल जोडणे आवश्यक असेल.

५. महाराष्ट्र शासन पुरस्कृत राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने मंजूर होणारे अनुदान फक्त त्या एका संबंधित आर्थिक वर्षासाठी असेल व यासंदर्भातील अनुदानाचे सर्वसाधारण नियम व अटी संबंधित मंडळ / संस्थांना लागू होतील.

६. अर्जदार, मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचे उपयोजन प्रमाणपत्र, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व त्या वर्षातील जमा खर्चाचा तपशील विनियोजन विवरणपत्रासह, विहित कालमर्यादेत अनुदान मंजुरीच्या वित्तीय वर्ष अखेरपर्यंत महाराष्ट्र शासन पुरस्कृत राज्य मराठी विकास संस्थेस सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा सदर संस्था पुढील काळात अनुदान मंजुरीसाठी अपात्र ठरेल.

७. अर्जदार, मंडळ / संस्थेने मागील किमान ३ वर्षांचे सनदी लेखापालाने (Chartered Accountant) लेखापरिक्षित केलेले लेखा अहवाल राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर करणे आवश्यक राहील. सनदी लेखापाल अर्जदार संस्थेचा सदस्य नसावा.

८. राज्य मराठी विकास संस्थेने दिलेल्या निधीचा उपयोग मराठी भाषा, साहित्य या संदर्भात संशोधन विषयक उपक्रम राबविण्यासाठीच करण्यात येणार असल्याचे प्रमाणपत्र संस्थेने देणे बंधनकारक राहील.

९. मंडळ / संस्थेने दिलेल्या अनुदानाच्या खर्चाचा हिशोब शासनमान्य अधिकृत लेखापालाकडून सादर करणे बंधनकारक राहील.

१०. राज्य मराठी विकास संस्था अर्जदार मंडळ / संस्थांच्या अर्जांची छाननी करेल व जी मंडळे / संस्था राज्य मराठी विकास संस्थेचे निकष, नियम व अटींची पूर्तता करतील अशांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान उपलब्ध करून देयाची कार्यवाही करेल.

११. असे मंडळ, संस्था नोंदणी अधिनियम १८६० किंवा सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत धर्मादाय आयुक्तांकडे किंवा सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणी झालेली असावी. संस्था ५ वर्षापूर्वीची नोंदणीकृत असावी. मालकी हक्काने चालविण्यात येणाऱ्या संस्था अनुदानास पात्र असणार नाहीत.

१२. अनुदानासाठी अर्ज करणारी संस्था नफा कमावणारी नसावी.

१३. अनुदानासाठी अर्ज करणारे मंडळ / संस्था अर्जाबरोबर पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

- संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली प्रत.
- मंडळाच्या / संस्थेच्या सदस्यांनी आर्थिक साह्यासाठी घेतलेल्या निर्णयाची साक्षांकित प्रत.
- मंडळाची / संस्थेची अद्ययावत माहिती पुस्तिकेची प्रत.
- संस्थेच्या अद्ययावत वार्षिक लेखा अहवालाची प्रत.
- अर्जासोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे तसेच ओळखपत्र म्हणून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांपैकी २ व्यक्तींची पुढील तीन पैकी दोनची माहिती जोडण्यात यावी.

१. आधार कार्ड २. पासपोर्ट ३. वाहन चालवण्याचा परवाना इ. छायांकित प्रत.

- बँकेच्या धनादेशाची प्रत व बँक खात्याची पुढील माहिती असणारी बँक पुस्तिकेच्या पानाची छायांकित प्रत द्यावी.
- खातेदाराचे नाव (बँक पुस्तिकेवर)
- खाते क्र. (१३ डिजिटचे)
- बँकेचे नाव व पत्ता
- बँकेची शाखा आणि तिचा कोड क्र.
- आय.एफ.एस. (IFS) कोड.
- एम. आय. सी. आर. (MICR) कोड.

१४. अनुदानासाठी केलेल्या अर्जावर व अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांवर अर्जदाराची एक सारखी सही असावी.

१५. संस्थेने मंजूर केलेले अनुदान योग्य प्रकारे उपयोगात आणले गेले नसेल, पुरेशी प्रगती साध्य झालेली नसेल तर कामाच्या कोणत्याही टप्प्यावर मंजूर प्रकल्प बंद करण्याचे अधिकार पूर्णपणे संस्थेकडे राखीव असतील.

१६. कोणत्याही स्थापत्यविषयक बांधकाम, फर्निचर खरेदी इ. साठी हे अनुदान वापरता येणार नाही.

१७. मंजूर योजनेसाठी अनुदान काटेकोरपणे खर्च करण्यात आल्याची खात्री देण्यात यावी. लेखापरीक्षकाद्वारे प्रमाणित उपयोगिता प्रमाणपत्रही सादर करावे.

१८. अनुदान प्राप्त मंडळ / संस्था, या योजनेच्या अंतर्गत मिळालेल्या आर्थिक साहाय्याचा वापर, ते ज्या योजनेसाठी मंजूर केला गेला आहे त्यासाठीच खर्च करेल. तसे करण्यास अयशस्वी ठरणाऱ्या मंडळ / संस्था, यांना सक्षम अशा मंजुरी प्राधिकाऱ्याने निश्चित केलेल्या व्याजासहित अनुदानाची पूर्ण रक्कम परत करणे बंधनकारक असेल.

१९. मंजूर अनुदान कामाच्या स्वरूपाप्रमाणे तीन टप्प्यात देण्यात येईल. आवश्यक तिथे हे टप्पेही वाढवण्यात येतील. प्रत्येक टप्प्याच्या खर्चाच्या बाबीचे लेखा परीक्षण झाल्यानंतर व तसे काम पूर्ण झाल्याचा अहवाल, प्रमाणपत्र व प्रमाणपत्रासह संस्थेस सादर झाल्यानंतर अंतिम टप्प्याची रक्कम देण्यात यावी.

२०. अनुदान मंजूर करण्यासाठी संस्थेच्या किमान २ पदाधिकाऱ्यांची मुलाखत होईल. या मुलाखतींनंतर प्रत्यक्ष अनुदान मंजूर करण्याची प्रक्रिया सुरू होईल.